**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, अमरावती यांचेकडून प्राप्त झालेल्या अमरावती जिल्हयातील ३३ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत दि. ०७.१०.२०२४ रोजी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दुपारी १२.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---------------

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचेकडून अमरावती जिल्हयातील ३३ रेतीघाटांचे प्रस्ताव, पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ०७.१०.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, आघात मुल्यांकन विभाग, नवी दिल्ली यांचे दि. ०९ जुन २०२१ रोजीचे ऑफिस मेमोरेन्डम मधील तरतुदी नुसार घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ अमरावती यांनी आदेश क्र. E-157 of 2024 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-240916-FTS-0004 दि. १६.०९.२०२४ अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थितीत होते.

१. मा. श्री ज्ञानेश्वर घ्यार, अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती — अध्यक्ष
२. श्री. सं. दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती — सदस्य
३. श्री सुशिलकुमार राठोड, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती-१— समन्वयक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. ०५.०९.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ०७.१०.२०२४ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा निवासी उपजिल्हादंडाधिकारी मा. श्री ज्ञानेश्वर घ्यार यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम लोकसुनावणी समितीचे समन्वयक श्री सुशिलकुमार राठोड, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती-१ यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

अमरावती जिल्हयातील ३३ रेतीघाटांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी अमरावती यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईट, २रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमासमोर, सायन सर्कलजवळ, (पु.) मुंबई-४०००२२.
२. प्रादेशिक कार्यालय/उपप्रादेशिक कार्यालय, अमरावती, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी विवेकानंद कॉलनीजवळ, बापटवाडी, अमरावती-४४४६०६.
३. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, जिल्हा परिषद, अमरावती, जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती.
४. उप-विभागीय कार्यालय – धारणी / भातकुली / दर्यापूर / अचलपूर / चांदूर बाजार / मोर्शी, जि. अमरावती.
५. तहसिल कार्यालय - धारणी/भातकुली/दर्यापूर/अचलपूर/ चांदूर बाजार/वरुड, जि. अमरावती.
६. ग्रामपंचायत कार्यालय- चिचघाट/रत्नापुर/खा-या टेंभरू, ता. धारणी, कानफोडी /नांदेड खु./गणोजा देवी/दाढी, ता. भातकुली, नांदेड बु./बेलोरा/चांडोळा/लासुर/म्हैसपुर मोचर्डा/नालवाडा/बेंबळा बु./घडा /करतखेडा/रामतीर्थ/वडुरा/ ता. दर्यापुर, खैरी - दोनोडा/सावळपुर/ हिवरापुर्णा-येलकी पुर्णा, ता. अचलपुर, तळणी पुर्णा/हिरूरपुर्णा/टाकरखेडा,ता. चांदुर बाजार, वंडली/पवणी (स.)/देऊलवाडा/वघळ, ता. वरूड, जि. अमरावती.
७. नगर पंचायत , भातकुली, जि. अमरावती.

श्री सुशिलकुमार राठोड, उपप्रादेशिक अधिकारी, अमरावती-१ यांनी प्रकल्प समन्वयक यांना रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी एनव्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा. लि., नागपूर यांनी रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्री सुशिलकुमार राठोड, उपप्रादेशिक अधिकारी अमरावती-१ यांनी सांगीतले की, सदर रेती घाटांच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांना काही प्रश्न अथवा सुचना असल्यास मांडण्याबाबत सुचित केले.

श्री अमोल जाधव, सरपंच, लासुर, ता. दर्यापूर यांनी सुचित केले की, रेतीचा लिलाव हा पूर्वीप्रमाणेच करण्यात यावा. मात्र रेती डेपो हा संबंधीत गावातच देण्यात यावा. याबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी, अमरावती यांनी सांगीतले की, रेती घाटांच्या निविदा संदर्भात शासनाच्या धोरणानुसारच नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच त्यांनी इच्छूक स्थानिक व्यक्तींनी निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याबाबत आवाहन केले.

श्री प्रदीप अलोने, मोर्शी, ता. मोर्शी यांनी सुचित केले की, रेतीघाटांसाठी देण्यात येणारे रस्ते हे काही गावांमधून जाणारे असतात. सदर रस्ते वाहतुकीमुळे खराब होत असल्यामुळे गावकरी या रस्त्यांवरून रेती वाहतुक करण्यास मज्जाव करतात. त्यामुळे अशा ठिकाणी घाटमालकांना कशा प्रकारचे संरक्षण देण्यात येणार आहे याबाबत माहिती दयावी.

याबाबत प्रतिनिधी, एनव्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा. लि., नागपूर यांनी सांगीतले की, उपरोक्त रतीघाटांना रेती वाहतुक करण्याकरीता गावाच्या बाहेरून रस्ता देण्यात आलेला आहे. त्यामुळे रेतीवाहतुक करतांना रस्त्याची अडचण येणार नाही.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, अमरावती यांनी सुचना केली की, रेती घाटांना जोडणाऱ्या पोहोच रस्त्या संदर्भात इच्छूक निविदाधारकांनी सुदधा खात्री करून घ्यावी.

तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी या जनसुनावणी नंतरही काही सुचना असल्यास त्या लेखी स्वरूपात जिल्हा खनिकर्म कार्यालय, अमरावती येथे देण्याबाबत सुचित केले.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (सुशिलकुमार राठोड ) | ( सं. दे. पाटील ) | ( ज्ञानेश्वर घ्यार ) |
| समन्वयक | सदस्य | अध्यक्ष, लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप- प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | अपर जिल्हादंडाधिकारी |
| म.प्र.नि.मंडळ, अमरावती-१ | म.प्र.नि.मंडळ, अमरावती | अमरावती |